# ‘बजाज’तर्फे चार प्रकारचे पंखे दाखल

**पुणे :** बजाज इलेक्ट्रीकल्सने चार प्रकारचे खास वैशिष्ट्यपूर्ण सिलिंग पंखे दाखल केले असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. क्रुझ एअर, मॅग्निफिक, विन स्ट्रीम, आणि ऑस्ट्रीम अशी चार मॉडेल्स यात आहेत. प्रीमियम श्रेणीतील हे पंखे असून, याचे डिझाईन, रंग अत्यंत अभिनव आणि आकर्षक आहे. अत्याधुनिक घरांमध्ये शोभून दिसतील असे हे पंखे असून त्याची किंमत अडीच हजारांपासून पुढे आहे. सोनेरी, तपकिरी, लाल, चंदेरी अशा विविध रंगांमध्ये हे पंखे उपलब्ध आहेत.